'द न्यूज बिज टाईम्स'

दि. २/९/२०२६ पिंपरी, महाराष्ट्र, thenewzbiz@gmail.com वर्ष - दुसरे डिजीटल आवृती

# डिजिटल जगात 'स्मार्ट' होण्याचा सायबर मंत्र: एपीएस, दिघी येथे सायबर जनजागृती

पिंपरी, प्रतिनिधी :

डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक करण्याच्या उद्देशाने एपीएस, दिघी येथे डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपरीच्या क्विक हील फाउंडेशन सायबर वॉरियर क्लब यांच्या वतीने सायबर जनजागृती सत्र उत्साहात पार पडले. सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या ब्रीदवाक्या अंतर्गत, तसेच यावर्षीच्या माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलिटी या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या सत्रास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सत्रात सायबर वॉरियर्स कैवल्य गुरव आणि सार्थक पानसरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर गुन्ह्यांचे बदलते स्वरूप, फसवणुकीच्या पद्धती आणि त्यापासून सुरक्षित राहण्याचे उपाय सोप्या भाषेत समजावून सांगितले. यावेळी ओटीपी फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ऑनलाइन गेमिंगमधील धोके, मजबूत पासवर्ड, डीपफेक, एआय फोटो मॉर्फिंग, डिजिटल फूटप्रिंट, सुरक्षित संकेतस्थळ ओळखणे, सायबरबुलिंग, वैयक्तिक माहितीचे संरक्षण, सोशल मीडिया प्रेझेन्स, तसेच मोबाईल प डाउनलोड करताना व प परमिशन्स देताना घ्यावयाची दक्षता या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना विषय अधिक प्रभावीपणे समजावा, यासाठी हॅकर मास्कचा वापर करून संवादात्मक खेळ व उपक्रम घेण्यात आले. भरात घडलेल्या वास्तविक सायबर गुन्ह्यांच्या केस स्टडीज सादर करून गुन्हेगार कोणत्या पद्धतीने नागरिकांची फसवणूक करतात, त्यापासून स्वतः चे संरक्षण कसे करावे आणि सायबर फसवणूक झाल्यास राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन १९३० तसेच नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल – सायबरक्राईम डॉट जीओव्ही डॉट इन वर तक्रार कशी नोंदवावी, याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाला एपीएस, दिघीच्या समन्वयक सुचिता वाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी सायबर वॉरियर्सच्या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचे आणि मिळालेली माहिती आपल्या कुटुंबीय व मित्रपरिवारापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतल्याबद्दल त्यांनी त्यांचे कौतुक केले.

या उपक्रमासाठी क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील, क्लबचे महाविद्यालयीन समन्वयक प्रा. सत्यवान कुंजिर यांनी आवश्यक मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या बदलत्या आव्हानांची जाणीव करून देत त्यांच्यामध्ये सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल वर्तनाची सवय निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचे पाऊल ठरला.

